भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. १६४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०७/०३/२०१७

**१) दारू पिलेल्या स्थितीत मृत अवस्थेत मिळुन आल्याने मर्ग नोंद . :—**

दिनांक ०६/०३/२०१७ चे ०८.३० वा. दरम्यान यातील मृतक सतिश श्रावण इंगोले वय ४५ वर्ष, रा. सोनी ह.मु. नागपुर हा इंदोरा ते अरूणनगर जाणाऱ्या रोडचे बाजुला दारू पिलेल्या स्थितीत मृत अवस्थेत मिळुन आल्याने फिर्यादी सरतर्फे पोना वडेटीवार पोस्टे. लाखांदुर यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पो.नि. भोयर पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहे.

**२) लाकडी फाटयाला नायलॉन दोरीने गळफास लावुन मृत्यु झाल्याने मर्ग नोंद :—**

दिनांक ०५/०३/२०१७ चे २२.०० वा. ते ०६/०३/२०१७ चे ०६.०० वा. दरम्यान यातील मृतक निलकंठ तुळशीराम भोयर वय २७ वर्ष, रा. सिपेवाडा पोस्टे लाखनी हा आपल्या घराचे जनावरांच्या कोठयातील लाकडी फाटयाला नायलॉन दोरीने गळफास लावुन मरण पावल्याने फिर्यादी जिवन तुळशीराम भोयर वय ३६ वर्ष, रा. सिपेवाडा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. संतापे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहे.

**३) छातीत दुख:त असल्याने औषधपचारा दरम्यान मरण पावल्याने मर्ग नोंद . :—**

दिनांक ०६/०३/२०१७ चे ०९.०० वा. दरम्यान यातील मृतक बन्सीलाल व. आत्माराम भोयर वय ५६ वर्ष, रा.मानेगांव सडक पोस्टे लाखनी याचे छातीत दुख:त असल्याने औषधपचारा करिता पी.च.सी. धारगाव येथिल एम.ओ. सा. यांनी पुढील औषधपचारा करिता सामान्य रूग्नालय भंडारा येथे रेफर केले असता एम.ओ. सा.अर्चना मेश्राम सामान्य रूग्नालय भंडारा यांनी तपासुन मृत घोषीत केल्याने डॉक्टरी मेमो व मृतकाचे मुलाचे बयानावरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. गौर पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहे.

**४) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक ०६/०३/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली ९७ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०३, तीन सिटर वाहनांवरती ०७ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ८७ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

07.3

(एस. व्ही. कुलकर्णी)
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.